ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# जागतिकीकरणानंतर वाढते शहरीकरण व नगरपरिषदांची भूमीका

अमोल तुकाराम खाडे[१] , टी.जी.सिराळ[२]
[१]सहा.प्राध्यापक , अर्थशास्त्र विभाग , डी.एस.जी.सिनियर कॉलेज , मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर.
[२]सहयोगी प्राध्यापक , संशोधन मार्गदर्शक , नागनाथ महाविद्यालय ,औंढा (ता.) जि.हिंगोली.

## प्रस्तावना

भारतात जागतिकीकरणानंतर शहरीकरणाचा वेग वाढल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील लोक रोजगार, व्यवसाय, उदयोग, शिक्षण इ. कारणासाठी शहराकडे धाव घेतात. यातून शहरातील लोकसंख्या वेगाने वाढत जाऊन शहरीकरणाची गती वाढत जाते. शहरातील या वाढत्या लोकसंख्येला नागरी सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अलिकडील काळात नगरपरिषदांची भूमीका महत्त्वपूर्ण ठरते आहे. त्या अनुषंगाने वाढते शहरीकरण व नगरपरिषदांच्या भूमीकेचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

## शोध निबंधाची उध्दिष्टे:-

१. शहरीकरण संकल्पना अभ्यासणे.
२. भारतातील शहरीकरणाच्या प्रवृत्तीचा आढावा घेणे.
३. शहराच्या विकासातील नगरपरिषदेची भूमीका अभ्यासणे.



## अभ्यास पध्दती :-

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

## शहरीकरण / नागरीकरण म्हणजे काय ?

शहरातील लोकसंख्या वाढीबरोबरच शहरांची संख्या वाढत जाणे यास शहरीकरण / नागरीकरण म्हटले जाते.

भारतात १९७१ च्या जनगणनेनुसार शहरीकरणाचे निकष ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार
I ) ज्या ठिकाणी (वस्तीमध्ये) महानगरपालिका, नगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड स्थापन झालेले आहेत. अशा वस्त्या की, ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केलेल्या आहेत.
II ) पाच हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या, दर चौकिमी ४०० पेक्षा जास्त घनता आणि बिगर कृषी व्यवसायात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे नगर होय.

शहरांच्या लोकसंख्येवरुन त्यांचे वर्गीकरण सहा प्रकारात केले जाते. त्यानुसार
वर्ग १ - एक लाखापेक्षा जास्त
वर्ग २ - ५० हजार ते ९९९९९
वर्ग ३ - २०००० ते ४९९९९
वर्ग ४ - १०००० ते १९९९९
वर्ग ५ - ५००० ते ९९९९
वर्ग ६ - ५००० पेक्षा कमी लोकसंख्या अशी वर्गवारी करण्यात येते.

त्याचप्रमाणे १ लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या ठिकाणास शहर, १ ते १० लाख लोकसंख्येच्या ठिकाणास नगर व १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या असलेल्या ठिकाणास महानगर तर ५० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणास महाकाय नगर संबोधले जाते.

भारतात प्रामुख्याने जागतिकीकरणानंतर शहरीकरणचा वेग प्रचंड वाढल्याचे दिसून येते. भारतात १९०१ मध्ये शहरी भागातील लोकसंख्येचे प्रमाणे केवळ १०.८९ % व एकूण शहरांची संख्या १६२७ एवढी होती. तर १९५१ मध्ये हेच प्रमाण अनुक्रमे १७.६% व २८४३ एवढे झाले. यावरुन असे लक्षात येते की १९०१ ते १९५१ या दरम्यानच्या काळात भारतातील शहरीकरणाचा वेग ४३% एवढा होता. जो की कमी असल्याचे दिसून येते.

१९६१ ते १९९१ या तीस वर्षांच्या कालावधीत भारतातील शहरी लोकसंख्येमध्ये ६३.७०% नी वाढ झाली. तर १९९१ ते २०११ या वीस वर्षादरम्यान हीच वाढ ४७.९०% झालेली दिसून येते.

१९९१ ते २०११ च्या दरम्यान भारतातील शहरांच्या संख्येत ४२% नी वाढ झालेली दिसून येते.

यावरुन असे लक्षात येते की, जागतिकीकरणानंतरच्या २० वर्षाच्या कालावधीत भारतातील नागरी लोकसंख्या , नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे शेकडा प्रमाण शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढल्याचे दिसून येते.

वाढत्या शहरीकरणाचे विविध परिणाम दिसून येतात. वाढत्या शहरीकरणामूळे शहरातील प्रदुषण मोठया प्रमाणात वाढते. तसेच शहरात झोपडपट्टी, गलिचछ वस्ती यामध्ये वाढ होते. त्यातून गुन्हेगारी, चोरी याचे प्रमाण वाढीस लागते. तसेच शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात. शुध्द पिण्याच्या पाण्याची कमतरता, सांडपाण्याची समस्या निर्माण होते.

थोडक्यात शहरीकरणमुळे मुलभूत सुविधांवर ताण निर्माण होऊन त्या अपुऱ्या पडतात.

वाढत्या शहरीकरणाबरोबर शहरातील लोकसंख्येला आधारभूत सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेची भूमिका महत्वाची ठरत आहे. नागरी क्षेत्रातील लोकसंख्येला लोकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याचे काम नगरपरिषद करीत असते.

नगरपरिषदेच्या कार्याचा आढावा आपणास पुढीलप्रमाणे घेता येईल.

### ❖ नगरपरिषदांची भूमीका व कार्ये :-

शहरी भागातील लोकांना नागरी मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी नगरपरिषदेची असते. या दृष्टीने नगरपरिषद विविध प्रकारची कार्ये करीत असते. नगरपरिषद प्रामुख्याने दोन प्रकारची कार्ये करीत असते.

अ) अनिवार्य कार्ये
ब) ऐच्छिक कार्ये

### अ) नगरपरिषदेची अनिवार्य कार्ये :-

नगरपरिषदेला जी कार्ये करणे कायदयानुसार बंधनकारक असते. त्यांना अनिवार्य कार्ये म्हटले जाते. अशी अनिवार्य कार्ये न केल्यास शासन नगरपरिषदलेला बरखास्त करु शकते. अशी कार्ये आवश्यक स्वरुपाची असतात.

I ) शहरात प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणे.
II ) सार्वजनिक आरोग्य केंद्र उपलब्ध करणे.
III ) शहरात रस्त्यांची निर्मिती व देखरेख करणे.
IV) शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.
V) शहरातील रस्त्यावर दिवाबत्ती, प्रकाश व्यवस्था करणे.
VI ) जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.
VII ) घरांना घरक्रमांक देणे.
VIII ) वाहतूक व्यवस्था सुरक्षित करणे.
IX ) धोकादायक इमारती ताब्यात घेऊन त्या जमीनदोस्त करणे.
X ) स्मशान भूमीची व्यवस्था करणे इ.

वरील प्रकारची कार्ये नगरपरिषदेला करावी लागतात. शहराच्या विकासाच्या दृष्टीने ही कार्ये महत्त्वाची असतात. ही कार्ये व्यवस्थितपणे झाल्यास शहराचा विकास वेगाने होत असतो. तसेच शहरातील लोकांना मुलभूत सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या राहणीमानात सुधारणा होते.

### ब) ऐच्छिक कार्ये :-

जी कार्ये करण्यासाठी नगरपरिषदेवर कोणत्याही प्रकारचे कायदेशीर बंधन नसते अशी कार्ये ऐच्छिक स्वरुपाची समजली जातात. नगरपरिषद आपली आर्थिक स्थिती, उत्पन्नाचा विचार करुन आवश्यकतेनुसार कार्य करावयाचे की नाही ते ठरवत असते व गरजेनुसार अशी कार्ये करत असते. ऐच्छिक कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

I ) सार्वजनिक उदयाने निर्मिती व देखभाल करणे.
II ) ग्रंथालये, व्यायामशाळा, विश्रामगृह इ. उपलब्ध करणे.
III ) गलिच्छ वस्ती सुधारणा करणे.
IV) क्रिडांगणाची सोय करणे.
V) माध्यमिक शिक्षण व्यवस्था करणे.
VI ) दुर्बल घटकांसाठी घर बांधणे.
VII ) सार्वजनिक सत्कार, प्रदर्शन व करमणूक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

VIII ) सर्वेक्षण करणे.

अशा प्रकारची ऐच्छिक स्वरुपाची कार्ये नगरपरिषद करीत असते. नगरपरिषदेच्या या कार्यामुळे शहराच्या विकासात भर पडते.
नगरपरिषद शहरातील लोकांना मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करणे, शहराच्या नियोजनबध्द विकास करण्यासाठी कार्य करीत असते. त्यादृष्टीने नगरपरिषदेची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते.

### ❖ समारोप :-

भारतात शहरीकरणाचा वेग वाढत आहे. दिवसेंदिवस शहरांची संख्या वाढत असताना, वाढत्या शहरी लोकसंख्येला मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेची जबाबदारी वाढली आहे. नगरपरिषदेने शहराचा नियोजनबध्द विकासाची जबाबदारी योग्यरित्या पार पाडणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने आपली भूमीका कार्यक्षमपणे पार पाडल्यास शहराच्या विकासाला गती प्राप्त होईल. त्याकरिता नगरपरिषदांनी विकास कार्यावर लक्ष केंद्रित करुन शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### ❖ संदर्भ :-

I ) census. २०११, Govt. of India, New Delhi.
II ) राहुल शं. म्होपरे, (२०१३) , जागतिकीकरणानंतर शहरीकरण : दशा व दिशा, अर्थसंवाद खंड ३७, अंक -२ , जुलै-सप्टेंबर २०१३.
III ) डॉ. अर्जुनराव दर्शनकार, पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरगांबाद
IV) प्रा. अ.ना.कुलकर्णी, भारतातील स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन, नागपूर